स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे कार्यालय,

रॉयल इन्शुरन्स इमारत, १४ ज. टा. मार्ग, चर्चगेट, मुंबई ४०० ०२०

दुरध्वनी क्र. : ०२२ २२८२१४१९, २२८५२८१४ ई-मेल : dycor.ho-mum@gov.in

क्र.निशि/आस्था/४-अ/पदोन्न./प्र.क्र.२/२०२५/जा.७०६ दिनांक : २८ /०२/२०२५

संदर्भ : १) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्या.१२, दिनांक ०१.०८.२०१९

२) शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६ ब, दिनांक ०७.०५.२०२१

कार्यालयीन आदेश :

शासकीय कार्यालयातील लिपिक टंकलेखक, गट क (सेवाप्रवेश) नियम, २०१७, दि. ६जुन, २०१७ व शासकीय कार्यालयातील लिपिक टंकलेखक, गट क (सेवाप्रवेश) (सुधारणा), नियम २०२२, दि. ०१ नोव्हेंबर, २०२२ अनुसार कलम ३ मधील अटींची पुर्तता करणाऱ्या नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई कार्यालयातील गट ड संवर्गामधील खालील कर्मचाऱ्यांना सन २०२४-२५ च्या निवडसूचीतून लिपिक टंकलेखक, गट क ( वेतनस्तर एस-६ : १९९००-६३२००) पदावर या आदेशाव्दारे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती देण्यात येत असून त्यांची पदोन्नतीनंतरची पदस्थापना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या रकाना क्र.५ मध्ये नमूद कार्यालयात करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | जात प्रवर्ग | कार्यालय | लिपिक टंकलेखक पदावर पदोन्नती नंतर पदस्थापना करण्यात आलेले कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री. विराज बाळकृष्ण मालवणकर | इ.मा.व | शि.का.क्र. ४१ फ भाईंदर | शि.का.क्र. २५ ड अंधेरी (प.) |
| २ | श्रीम. शिल्पा अमित भोसले | अ.जा. | शि.का.क्र. ३ अ नुरबाग | शि.का.क्र. ३३ ई चेंबूर |
| ३ | श्री. कार्तिककुमार अरूण साळवे | खुला | ई परिमंडळ, वडाळा | शि.का.क्र. ३४ ई घाटकोपर |
| ४ | कु. मनाली सुभाष तानवडे | खुला | प्रधान कार्यालय | प्रधान कार्यालय, चर्चगेट |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | श्री. अर्चित राजेश अंबोले | खुला | ड परिमंडळ, सांताक्रुझ | शि.का.क्र. २६ ड अंधेरी (पू.) |
| ६ | श्री. चंदु सुखदेव पाटील | खुला | शि.का.क्र. ६ अ सी.पी टँक | शि.का.क्र. ६ अ सी.पी.टँक |
| ७ | कु. सिध्दी भगवान ठोंबरे | खुला | ड परिमंडळ, सांताक्रुझ | ई परिमंडळ, वडाळा |

२. उपरोक्त पदोन्नत्या मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ च्या अंतीम निर्णयाच्या अधिन राहून पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदांवर ज्येष्ठतेने निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात देण्यात येत आहेत.

३. मागास प्रवर्गातील कर्मचाऱ्यांची निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती ही शासन निर्णय दिनांक २५.०५.२००४ मधील तरतुदीनुसार त्यांना आरक्षणाचा लाभ मिळून सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत, या अटीच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

४. सदर पदोन्नती तात्पुरत्या स्वरूपात असून सदर पदावर संबंधित कर्मचाऱ्यांचा कायमस्वरूपी धारणाधिकार राहणार नाही

५. हिंदी व मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमांनुसार पदोन्नत होणारा कर्मचारी अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाला नसेल किंवा त्याला सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर, सदर कर्मचाऱ्यांना ती परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील.

६. श्री. चंदु सुखदेव पाटील यांनी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दिनांक १९.०३.२००३ तसेच शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग क्रमांक -एसआरव्ही २०१७/प्र.क्र.४६२/कार्या-१२, दिनांक २८.०५.२०१८ व सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.आरटीआर १४०३/८४/प्र.क्र.५४/०३/१३, दिनांक १०.०५.२००५ मधील तरतुदीनुसार संगणक अर्हता (MS-CIT) प्राप्त केल्याचे प्रमाणपत्र या आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत सादर करणे आवश्यक राहील अन्यथा त्यांची नियमानुसार वेतनवाढ कार्यालयास प्रमाणपत्र सादर करेपर्यंत रोखण्यात येईल.

७. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक १२ जानेवारी, २०२३ अन्वये केवळ मराठी टंकलेखन प्रमाणपत्र धारण करणाऱ्या उमेदवाराने पदोन्नतीच्या दिनांकापासून ४ वर्षात इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० श.प्र.मि. वेगमर्यादेचे विहीत प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. तसेच केवळ इंग्रजी टंकलेखन प्रमाणपत्र धारण करणाऱ्या उमेदवाराने पदोन्नतीच्या दिनांकापासून ४ वर्षात मराठी टंकलेखनाचे किमान ३० श.प्र.मि. वेगमर्यादेचे विहीत प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा त्यांची वेतनवाढ रोखण्यात येईल.

८. पदोन्नत कर्मचाऱ्यांनी त्यांच्या वेतन निश्चितीबाबतचा विकल्प कार्यभार धारण केल्यापासून एक महिन्यांच्या आत सादर करावा, अन्यथा महाराष्ट्र नागरी सेवा (वेतननिश्चिती) नियम, १९८१ मधील तरतुदीनुसार त्यांचे वेतन निश्चित करण्यात येईल.

९. प्रस्तुत कर्मचाऱ्यांनी लिपिक टंकलेखक पदावरील पदोन्नती न स्विकारल्यास सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१५/प्र. क्र. ३०३/कार्यासन १२, दिनांक १२.०९.२०१६ अन्वये त्यांचे नाव सन २०२४-२५ च्या निवडसूचीतून काढून टाकण्यात येईल व पुढील २ वर्षी होणाऱ्या निवडसूच्यांमध्ये त्यांच्या नावाचा विचार न करता तिसऱ्या वर्षाच्या निवडसूचीत लिपीक टंकलेखक पदावरील पदोन्नतीची पात्रता तपासण्यात येईल.

१०. लिपिक टंकलेखक, गट क पदावर पदोन्नती देण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना पदस्थापना देण्यात आलेल्या कार्यालयामध्ये रुजू होणेकरीता संबंधित कार्यालय प्रमुखांनी तात्काळ कार्यमुक्त करावे. पदोन्नत कर्मचाऱ्यांना संबंधित कार्यालय प्रमुख यांनी पदोन्नतीच्या पदावर रुजू करून घेऊन त्याबाबतच्या अनुपालन dycor.ho-mum@mah.gov.in या ई-मेल वर सादर करावा.

( सुधाकर तेलंग, भा.प्र.से.)
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा, मुंबई

प्रति,

आदेशांतर्गत संबंधित कर्मचारी

प्रत :

१) उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी/आस्थापना), प्रधान कार्यालय
२) उपनियंत्रक शिधावाटप अ/ड/ई/फ व ग परिमंडळ मुंबई/ठाणे
३) सर्व शिधावाटप अधिकारी, मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्र
४) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई
५) जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे
६) मा. नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे स्वीय सहायक यांना माहितीसाठी
७) मुंबई शिधावाटप क्रेडीट सोसायटी, मुंबई
८) निवडनस्ती/मास्टरप्रत